8-1-16 ८. सावित्रीबाई फुले

प्रस्तावना -

आधुनिक महाराष्ट्राच्या उभारणीमध्ये ज्या थोर समाजसुधारकांनी हातभार लावला. त्यामधील पहिले समाज क्रांतीकारक म्हणून महात्मा जोतिबा फुले यांना ओळखले जाते. त्यांच्या कार्याची दखल घेतल्याशिवाय आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास पूर्ण होत नाही. महात्मा जोतिबा फुले यांच्या बरोबरीने त्यांच्या धर्मपत्नी सावित्रीबाई फुले यांचे शैक्षणिक, सामाजिक व वाङ्मयीन कार्य महाराष्ट्राच्या पुरोगामी इतिहासात अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. स्त्रियादेखील पुरुषांच्याबरोबरीने युगप्रवर्तक कार्य करू शकतात. हे सावित्रीबाईंनी आपल्या कर्तृत्वाने सिद्ध करून दाखवले आहे.

19 व्या शतकात पेशवाईच्या ऱ्हास होऊन ब्रिटीश राजवटीला प्रारंभ झाला. तत्कालीन भारतीय समाज व्यवस्था अनेक समस्यांनी व्यापलेली होती. यावेळी सावित्रीबाईंनी पुरोगामी धोरण स्विकारून शिक्षण सामाजिक परिवर्तन सामाजिक सुधारणा यासाठी केलेले कार्य महत्त्वपूर्ण ठरलेले आहे.

जीवनवृत्तांत -

स्त्री जीवनात ज्ञानाची ज्योत प्रज्वलित करून प्रकाशाची वाट दाखविणाऱ्या पहिल्या स्त्री शिक्षिका क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचा जन्म सातारा जिल्ह्यातील नायगाव या ठिकाणी '3 जानेवारी 1831 रोजी खंडोजी नेवसे-पाटील यांच्या कुटुंबामध्ये झाला. त्यांचे वडिल खंडोजी नेवसे-पाटील यांच्या समाजकार्याचा प्रभाव सावित्रीबाईंच्या व्यक्तिमत्वावर पडला. त्या काळामध्ये बालविवाहाची प्रथा असल्यामुळे सावित्रीबाईंचा विवाह वयाच्या 9 व्या वर्षी सन 1840 मध्ये महात्मा जोतिबा फुले यांच्याशी झाला. सावित्रीबाई फुले यांनी वैवाहिक जीवनाबरोबरच सामाजिक कार्यालादेखील सुरुवात केली. त्यांच्या या कार्याचा

Scanned with CamScanner

सामाजिक सुधारणेमधील योगदानाचा आढावा पुढीलप्रमाणे.

## शैक्षणिक कार्य -

सावित्रीबाई फुले यांचे विवाहापूर्वी शिक्षण झाले नसले तरी त्यांना शिक्षणाची विलक्षण आवड होती. हे जोतिबांच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी सावित्रीबाईच्या शिक्षणाची सुरुवात केली. जोतिबा फुले यांची मावस बहिण सगुणाबाई व सावित्रीबाई यांना जोतिरावांनी प्राथमिक शिक्षण देऊन पुण्यातील नॉर्मल स्कुलमध्ये दाखल केले. नॉर्मल स्कुलच्या प्रमुख मिचेलबाई यांनी या दोघींची अभ्यासक्रम पूर्णतेनंतर परीक्षा घेतली. यानंतर सावित्रीबाईनी अहमदनगरला शिक्षिकेचे प्रशिक्षण पूर्ण केले.

भारतीय समाजात स्त्रियांना शिक्षण व समता यापासुन वंचित ठेवले जात होते. व्यक्तीच्या विकासासाठी शिक्षण आवश्यक असून शिक्षण हेच सर्वांगिण सुधारणांचे मुळ आहे. हे शिक्षणाचे महत्त्व महात्मा फुले व सावित्रीबाई यांनी ओळखल्याने स्त्री शिक्षणास सुरुवात केली.

महात्मा फुले यांनी सावित्रीबाईच्या सहकार्याने पुण्यातील बुधवार पेठेतील भिडेवाड्यात 1 जानेवारी 1848 रोजी मुलींसाठी पहिली शाळा सुरु केली. या शाळेने स्त्री शिक्षणाचा पाया घातला गेला. पहिल्या शिक्षिका व पहिल्या मुख्याध्यापिका म्हणून सावित्रीबाई कार्य करु लागल्या. मुलींच्या शिक्षणाचे महत्त्व पटवून दिल्याने शाळेतील मुलींची संख्या वाढू लागली. या कालखंडात सन 1848 ते सन 1852 या कालावधीत जोतिबा व सावित्रीबाईनी एकूण 18 शाळा सुरु केल्या त्यामध्ये हडपसर, कसबा पेठ, तळेगाव, रास्ता पेठ, वेताळ पेठ, नायगाव इत्यादी ठिकाणांचा समावेश होतो.

Scanned with CamScanner

13-1-16 शिक्षण प्रसाराच्या या कार्याला दिशा मिळावी व गती प्राप्त व्हावी. यासाठी महात्मा फुले यांनी एक कार्यकारी मंडळ स्थापन केले होते. सावित्रीबाईंनी केवळ पुस्तकी ज्ञान न देता व्यावहारिक दृष्टीकोनातून विद्यार्थ्यांचा विकास करण्यावर भर दिला.

सावित्रीबाईंच्या शैक्षणिक कार्यामधून समाजामध्ये क्रांती घडून येत असताना काही सनातनवादी लोकांकडून त्यांची अवहेलना केली जात होती. समाजाच्या या दबावापोटी महात्मा फुले व सावित्रीबाईंना आपले घर सोडावे लागले होते. त्यावेळी जोतिबांचे मित्र उस्मान शेख यांनी जोतिरावांना आपल्या घरात राहण्यासाठी जागा दिली. त्यांचीच मुलगी 'फातिमा शेख' ही शिक्षण घेऊन पहिली मुस्लिम शिक्षिका झाली. सावित्रीबाई फुले यांच्या या शैक्षणिक कार्याचा गौरव म्हणून ब्रिटिश अधिकार मेजर कॅन्डी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

वरीलप्रमाणे सावित्रीबाई फुले यांनी महात्मा फुले यांच्याबरोबर बहुजन समाजात व विशेषकरून स्त्रीशिक्षणामध्ये ज्ञानाची ज्योत प्रज्वलित करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केलेले आहे.

२. सामाजिक कार्य -

19 व्या शतकात बहुजन समाज सामाजिक आर्थिक धार्मिक आणि राजकीय या सर्व परिस्थितीमध्ये गुलामगिरीच्या बंधनामध्ये अडकून पडलेला होता. बालविवाहाची प्रथा विधवांचे प्रश्न सती पद्धत केशवपन शेतकऱ्याचे शोषण अशा अनेक समस्यांनी भारतीय समाज व्यवस्थेला व्यापलेले होते. अशावेळी शैक्षणिक कार्याबरोबरच समाजसुधारणेच्या कार्यावरती सावित्रीबाई व महात्मा फुले यांनी भर दिला होता. तो पुढीलप्रमाणे

A बालहत्या प्रतिबंधक गृह -

विधवा पुनर्विवाहाची पद्धत त्यावेळी समाजामध्ये मोठ्या प्रमाणात स्विकारली न गेल्याने विधवा स्त्रियांना काही विशिष्ट प्रसंगांना सामोरे जावे लागत होते. काही तरुण विधवा मुली मोहाला बळी पडल्यास समाजाकडून तिच्यावरती बहिष्कार घातला जात असे अशा स्त्रियांना भ्रूणहत्या व स्वतः आत्महत्या केल्याशिवाय दुसरा कोणताही पर्याय उपलब्ध नव्हता. यामधून विधवा स्त्रियांची सुटका करण्यासाठी बालहत्या थांबवण्यासाठी जोतिबा व सावित्रीबाई फुले यांनी 28 जानेवारी 1863 रोजी 'बालहत्या प्रतिबंधक गृह व प्रसुति गृह' स्थापन केले.

15-1-16 B विधवा पुनर्विवाह -

बालविवाह, बालजरठविवाह या पद्धतीमुळे बाल विधवांचे प्रमाणदेखील अधिक होते. पत्नीच्या मृत्युनंतर पुरुषांना दुसरा विवाह करण्यास मान्यता होती. परंतु स्त्रियांना दुसऱ्या विवाहाची मान्यता समाजाकडून दिली जात नव्हती. विधवा स्त्री हे तत्कालीन समाजव्यवस्थेमध्ये अशुभ मानले जात होते. विधवा स्त्रियांचा शारिरीक मानसिक छळ अधिक केला जात असे. अशा परिस्थितीमधून विधवा स्त्रियांची सुटका करण्यासाठी महात्मा फुले व सावित्रीबाई यांनी विधवा पुनर्विवाहाचा पुरस्कार केला. 8 मार्च 1864 मध्ये त्यांनी शेनवी (ब्राम्हण जातीमधील) विधवा विदुराचा एक पुनर्विवाह घडवून आणला. 'सावित्रीबाईंनी विधवा पुनर्विवाह संस्थेची स्थापना केली.' या संस्थेमध्ये स्त्रियांचे प्रश्न विधवा स्त्रियांचे प्रश्न स्त्री शिक्षण याविषयांवरती चर्चा केली जात होती. सावित्रीबाई फुले यांनी विधवा पुनर्विवाहाचा पुरस्कार केल्याचे निदर्शनास येते.

Scanned with CamScanner

८. अस्पृश्यता निवारण.

हिंदू समाज रचनेमध्ये अस्तित्वात असणाऱ्या वर्णव्यवस्थेने अनेक वर्षापासुन कनिष्ठ अस्पृश्य लोकांना अत्यंत हीनदर्जाची वागणुक दिलेली होती. मंदिर, शाळा, सार्वजनिक ठिकाणे, याठिकाणी त्यांच्या सहभागावर बंधने लादण्यात आलेली होती. अस्पृश्य समाजाची गुलामगिरीमधून सुटका करण्यासाठी जोतिबा फुले व सावित्रीबाई यांनी अस्पृश्यता निवारणाचे कार्य सुरु केले. अस्पृश्यांमध्ये शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी 1852 मध्ये वेताळ पेठेत एक स्वतंत्र शाळा सुरु केली. सन 1853 साली 'महार मांग इत्यादी लोकांस विद्या शिकविण्याकरिता मंडळी' या नावाची संस्था स्थापन केली. अस्पृश्यांमध्ये आपल्या अधिकाऱ्यांची जाणिव निर्माण करण्याचा प्रयत्न सावित्रीबाईनी केला.

हिंदू धर्मातील वर्णव्यवस्थेमुळे शुद्र लोकांवरती अनेक निर्बंध लादण्यात आले होते. सार्वजनिक पाणवठ्यावरदेखील त्यांना प्रवेश नाकारण्यात आला होता. त्यामुळे या लोकांना पाण्यासाठी भटकंती करावी लागत असे जोतिबा व सावित्रीबाई यांनी आपल्या घरातील पाण्याचा हौद सन 1868 मध्ये अस्पृश्यासाठी खुला केला. त्याबरोबरच सावित्रीबाईनी महिलांसाठी हळदी-कुंकवाचा सार्वजनिक कार्यक्रम घडवून आणला. सर्व जाती धर्माच्या स्त्रियांना एकत्रित करुन त्यांच्यात जागृती करण्याचा प्रयत्न केला. महात्मा फुले यांच्या बरोबरीने सावित्रीबाई यांनी अस्पृश्यता निवारण्याच्या कार्यामध्ये सहभाग घेतलेला आहे. यावरुनच अस्पृश्य समाजाविषयी असणारी तळमळ व पुरोगामी विचार दिसून येतात.

Scanned with CamScanner

16

⑦ केशवपनास बंदी आणि नाभिक बांधवांचा संप-

तत्कालीन भारतीय समाजामध्ये केशवपन ही एक अनिष्ठ प्रथा होती. विधवा स्त्रियांना या प्रथेला सामोरे जावे लागत होते. ही प्रथा बंद करण्यासाठी सावित्रीबाई फुले यांनी पुणे व मुंबईमधील नाभिक बांधवांची परिषद घेऊन विधवा स्त्रियावरती होणाऱ्या या अत्याचाराची जाणिव करून दिली. विधवांचे केशवपन करू नये. असे आव्हान केले. त्यांच्या या कार्याला नाभिक बांधवानी संप करून साथ दिली. भारताच्या इतिहासातील नाभिक बांधवाचा हा ऐतिहासिक संप म्हणून ओळखला जातो.

⑧ सत्यशोधक समाजातील कार्य-

महात्मा फुले यांनी स्थापन केलेल्या सत्यशोधक समाजाध्ये कार्य सावित्रीबाई फुले यांनी निष्ठेने पार पाडले. सासवड याठिकाणी झालेल्या सत्यशोधक समाजाच्या परिषदेमध्ये अध्यक्षा म्हणून सावित्रीबाई उपस्थीत होत्या. सत्यशोधक समाजाच्या साहय्याने स्त्री शिक्षणाचा प्रसार, अस्पृश्योद्दार / अस्पृश्य उद्दार सामाजिक सुधारणा या प्रकारचे कार्य त्यांनी केले. 1876 मधील महाराष्ट्रात जो भिषण दुष्काळ पडला होता. त्यावेळी जनसामान्यासाठी मोठे कार्य त्यांनी केले. त्याचवर्षी आलेल्या महापुरामुळे उद्दवस्त झालेले पुरग्रस्त लोकांसाठीदेखील त्यांनी कार्य केले.

महात्मा फुले यांच्या मृत्युनंतर सामाजिक कार्याची धुरा सावित्रीबाईनी समर्थपणे पार पाडली. सामाजिक सुधारणा व सामाजिक परिवर्तनामध्ये वरीलप्रमाणे त्यांनी योगदान दिलेले आहे.

Scanned with CamScanner

. ग्रंथसंपदा किंवा वाङ्मयीन कार्य -

उत्तम शिक्षिका समाजसेविका याबरोबरच सावित्रीबाई फुले बुद्धीमान लेखिका व प्रतिभाशाली कवयित्री होत्या. 'काव्यफुले' 'बावनकशी सुबोध रत्नाकर' हे त्यांचे काव्यसंग्रह विशेष प्रसिद्ध झालेले आहेत. 'जोतिबांची भाषणे' याचे संपादन सावित्रीबाईंनी केले आहे. 'जोतिबा फुले यांना सावित्रीबाईंनी लिहिलेली पत्रे तसेच सावित्रीबाईंची भाषणे व गाणी' हे देखील प्रकाशित झालेले आहेत. शिक्षण, समता, जातीभेद, इतिहास याचे चित्रण त्यांनी काव्यरूपामध्ये केलेले आहे. सावित्रीबाई फुले यांनी आपल्या लिखाणामधून महाराष्ट्राला पुरोगामी शक्ती देण्याचे कार्य केलेले आहे.

सारांश -

सावित्रीबाई फुले यांचे चरित्र म्हणजे समाजाला अज्ञानमय अंधकारातून प्रकाशाकडे नेणारा एक दिशादर्शक मार्ग आहे. स्त्री शिक्षण अस्पृश्यांचे शिक्षण विधवा पुनर्विवाह, बालहत्या प्रतिबंधक गृह, केशवपनास बंदी यासारख्या असंख्य सामाजिक सुधारणा सावित्रीबाईंनी केल्या. पहिल्या शिक्षिका व मुख्याध्यापिका आणि स्त्रीमुक्ती आंदोलनाच्या आद्यप्रणेत्या म्हणून सावित्रीबाई फुले यांना ओळखले जाते. स्त्रीदेखील पुरुषांच्याबरोबरीने युगप्रवर्तक कार्य करू शकतात. हे सावित्रीबाईंनी संपूर्ण विश्वाला दाखवून दिले.

Scanned with CamScanner